Jagdamba Education Society's

**Jagdamba Education Society's**

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

**Accredited by**

NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 04/06/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## सदाबहार चित्रपट अभिनेत्री नूतन बहल



बॉलिवूडच्या सदाबहार अभिनेत्रींमध्ये नूतन या नावाचा समावेश आहे. तिच्या अभिनयाची जादू काही औरच होती. ब्लॅक अँड व्हाईटच्या जमान्यात नूतन एक रंगबेरंगी रत्न होती. नूतनचा जन्म ४ जून १९३६ रोजी मुंबईत झाला. तिचे वडील प्रसिद्ध सिनेनिर्माता, मराठी कवी आणि आई अभिनेत्री होती. वयाच्या १४ व्या वर्षी तिने १९५० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'हमारी बेटी' सिनेमातून फिल्म डेब्यू केला. पुढे वयाच्या १६ व्या वर्षी १९५२ मध्ये तिने 'मिस इंडिया'चा ताज जिंकला. तिचे यश बऱ्याच लोकांना बघवत नव्हे. कित्येकांनी कुरूप म्हणत तिची टिंगल केली. पण चेष्टा हेच आपले कौतुक म्हणत नूतनने काम सुरू ठेवले. काही सिनेमात काम केल्यानंतर ती लंडनला गेली आणि परतल्यानंतर तिने 'सीमा' सिनेमात काम केले. ज्यासाठी तिला फिल्मफेअरचा 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्री' हा पुरस्कार मिळाला. पुढे 'पेइंग गेस्ट', 'बंदिनी', 'अनारी', 'सुजाता कर्मा'सारख्या सिनेमात ती झळकली.

'मिस इंडिया'चा 'किताब पटकावणारी आणि स्वीमसूट घालून सिनेमात काम करणारी नूतन पहिलीच बॉलिवूड अभिनेत्री होती. तिला वयाच्या १४ व्या वर्षी 'मुघल-ए-आझम' सिनेमात अनारकलीच्या भूमिकेची ऑफर आलेली. पण तिने या भूमिकेसाठी नकार दिला होता. लोकांचे टोमणे ऐकून ऐकून तिचा आत्मविश्वास कमी होऊ लागला. वयाच्या २३ व्या वर्षी लेफ्टनंट कमांडर रजनीश बहल यांच्याशी तिचा विवाह झाला. तिने लग्नानंतर सिनेमा सोडायचं ठरवलं होतं. त्यामुळे दिग्दर्शक बिमल रॉय यांचा 'बंदिनी' सिनेमा तिने नाकारला. पण रजनीश यांनी तिला सिनेमात काम करण्यासाठी प्रोत्साहित केलं आणि पुढे तिची कारकीर्द सुरू राहिली. अभिनेत्री नूतनचे २१ फेब्रुवारी १९९१ मध्ये ब्रेस्ट कॅन्सरने निधन झाले.

Nashik Edition

Jun 04, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

Jagdamba Education Society's

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401